Priyraj Dr. Priyraj Maheshkar Maheshkar

**To cite this version:**

Priyraj Dr. Priyraj Maheshkar Maheshkar. . Buddhism Ambedkar Issue and Interpretations, Mar 2011, Nagpur, India. hprints-03384767

**HAL Id: hprints-03384767**

**https://hal-hprints.archives-ouvertes.fr/hprints-03384767v1**

Submitted on 19 Oct 2021

**HAL** is a multi-disciplinary open access archive for the deposit and dissemination of scientific research documents, whether they are published or not. The documents may come from teaching and research institutions in France or abroad, or from public or private research centers.

L'archive ouverte pluridisciplinaire **HAL**, est destinée au dépôt et à la diffusion de documents scientifiques de niveau recherche, publiés ou non, émanant des établissements d'enseignement et de recherche français ou étrangers, des laboratoires publics ou privés.

# Buddhism

## Ambedkar Issues and Interpretations

• Editor •
Yeshodhara Hadke

• Editorial Board •
M.S. Wankhede
Ratnakar Bhelkar
D.S. Shambharkar
R.K. Shobhne
Meerasingh Kakan

• Published by •
**Dr. Baban Taywade,** Principal,
Dhanwate National College, Congress Nagar, Nagpur - 440 012
Tel. 0712-2422759 Fax : 0712-2444193
Email : dhanwatenationalcollege@yahoo.com
Website : www.dncnagpur.com

**Published by**
**Dr. Baban Taywade,** Principal,
Dhanwate National College, Congress Nagar, Nagpur - 440 012
Tel. 0712-2422759 Fax : 0712-2444193
Email : dhanwatenationalcollege@yahoo.com
Website : www.dncnagpur.com

**Affiliated by Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University,
Nagpur, MS (INDIA)**

**Copyright © the Editor**

Copyright © All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted in any form or by any means electronic, mechanical, photocoping recording or otherwise without the prior permission of the Editor.

The papers included in this publication have been directly reproduced, with minimum editorial intervention, from the files sent by the respective authors. Opinions expressed in the selected research papers are those of contributors and do not necessarily reflect the views of seminar proceedings publication committee. The editorial board or college is not responsible for any consequences relating to any information contained therein.

**Edition: 2011**
**ISBN -13 - 978-81-921416-4-0**

**Typesetting & Printed by**
**Dinesh Graphic**
54-G Vishnu Apartment, Shop No. 3 Trimurti Nagar
Ring Road, Bhamti, Nagpur-440 022
Ph. 9422119631

**Price**
**Rs. 100/-**

# Contents

**Dr. Ambedkar's Conversion to Buddhism and its Relevance for the 'Post-Modern Condition'** ........ 01 - 08
Pradeep Gokhale

**Constructing Visuality As Conflicting Paradigm** ........ 09 - 17
Y. S. Alone

**Buddhist Aesthetics : Dr. Ambedkar's Preception** ........ 18 - 22
Snatosh I. Raut

**Constitutional Social Justice and Buddhist Welfare State** ........ 23 - 30
M. S. Wankhede

**Liberalization, Globalization, Privatization and Ambedkarite Philosophy** ........ 31 - 33
U. D. Sadaphal, C. V. Bhusari, D. B. Punse,

**Dr. B. R. Ambedkar's Philosophy And Gender Justice** ........ 34 - 38
Nitin Govindrao Wathore

**Humanism, Reservation and Social Justice in View of Dr. Ambedkar in Indian Constitution** ........ 39 - 43
Bhagyashree A. Deshpande

**Psychological Investigation in Buddhist Religion and Cultural Orientation** ........ 44 - 46
C. P. Labhane

**Dr. Ambedkar's Conversion to Buddhism and 21st Century** ........ 47 - 50
Nandkishor K. Ramteke

**Social Justice and Reservation Policy under Indian Constitution : Ambedkar's View** ........ 51 - 53
Vivek Vithalrao Jawale

**Dr. Ambedkar & His Philosophy towards Women Education** ........ 54 - 57
Archana Malik-Goure

**Dr. B. R. Ambedkar's Views On Emancipation Of Women** ........ 58 - 60
Rajshri S. Gajghate

**Philosophy of the Buddha and Social Justice from Dr. Babasaheb Ambedkar's View** ........ 61 - 65
Pradeep Hadke, Yeshodhara P. Hadke

**Economic Thoughts of Dr. Ambedkar & Globalization, Liberalization & Privatization in India** ........ 66 - 68
Dr. Sangita M Jiwankar

**Buddha's Teachings** ........ 69
SadhanaThakare

**Socio-Legal Philosophy of Ambedkar in Context of prohibition and protection of Caste Discrimination under Indian Constitution** ........ 70 - 73
Ku. Kalpana Vithalrao Jawale

**Dr. Ambedkar's Conversion to Buddhism and the 21st Century** ........ 74 - 76
A. N. Dasode, Nitin K. Wasnik, Pravin J. Ganjare

**कृषी विकासाबाबत डॉ. आंबेडकरी तत्वज्ञान** ........ 77 - 83
प्रा. राजकुमार मून

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर व शेतकऱ्यांची विकासात्मक दिशा** ........ 84 - 90
डॉ. श्रीनिवास डी. मानेकर

मानवतावाद, आरक्षण व सामाजिक न्यायासंदर्भात डॉ. आंबेडकरांचे तत्त्वविचार ........ 161 - 163
बी.टी. अंभोरे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आरक्षण विषयक व सामाजिक न्यायाची भूमिका ........ 164 - 165
कमलकिशोर बा. इंगोले, प्रदीप बा. इंगोले

मानवतावाद, आरक्षण आणि सामाजिक न्याय : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टिकोन ........ 166 - 170
नलिनी टेंभेकर (चिमणकर), ओमप्रकाश चिमणकर,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मानवतावादी, सामाजिक न्याय आणि आरक्षण विषयी विचार ........ 171 - 173
वर्षा गायकवाड-पाटील

डॉ. आंबेडकरांचा स्त्री-पुरुष समता सिद्धांत ........ 174 - 177
रतिराम एस. पाटील

धम्म स्वीकारानंतरची 'आंबेडकरी संस्कृती' व सांस्कृतिक प्रतीके ........ 178 - 180
प्रियराज महेशकर

डॉ. आंबेडकारांची धर्मसंकल्पना ........ 181 - 182
रेखा केळापुरे

मानवतावाद आरक्षण आणि सामाजिक न्याय : डॉ आंबेडकरांचा दृष्टीकोन ........ 183 - 186
वंदना मेश्राम इंगळे, मनीषा वाकडे

धर्मांतरानंतर बौद्ध समाजाचा धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास : एक अध्ययन ........ 187 - 189
माधुरी पाटील , प्रशांत पाटील

जागतिकीकरण आणि भारतीय संविधान ........ 190 - 193
स्वर्णलता वारके

आंबेडकरी तत्त्वज्ञान आणि महिला सक्षमीकरण ........ 194 - 196
मारोती बी. राठोड, विनोद आर. चव्हान

ख़ाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण आणि आंबेडकरी तत्त्वज्ञान ........ 197 - 199
सिद्धार्थ बुटले

बौद्धमय भारत की बात - बाबासाहब का सपना नही, सोचा समझा नियोजन था ........ 200 - 203
शत्रुघ्य जाधव

डॉ. बाबासाहेब आंबेडकर का धर्मांतरण 21 वी सदी के प्रबुद्ध भारत के निर्माण का आदर्श है ........ 204 - 209
दिगांबर खोब्रागडे

डॉ. बाबासाहेब अंम्बेडकर के कृषि सम्बन्धी विचार और उनका कार्य ........ 210 - 211
ज्योती वसंत खडसे

आधुनिक काल में बौद्ध कला और संस्कृति ........ 212 - 213

■■■

# धम्म स्वीकारानंतरची 'आंबेडकरी संस्कृती' व सांस्कृतिक प्रतीके

प्रियराज महेशकर *

एखाद्या मानवी समाजाची जीवन जगण्याची पध्दती म्हणजे त्या समाजाची 'संस्कृती' होय. समाजातील विशिष्ट रूढी, परंपरा,प्रथा आणि समजुतींच्या आधाराने प्रत्येक मानवी समाजाने स्वतःची अशी एक वेगळी जीवन जगण्याची रीत विकसित केलेली असते.

भारतीय संस्कृती कोशातील व्याख्येनुसार, ''प्रकृती म्हणजे निसर्ग, विकृती म्हणजे निसर्गात होणारा विकार आणि संस्कृती म्हणजे प्रकृतीत विकार किंवा बिघाड होऊ नये या उद्देशाने प्रकृतीवर करण्याचा संस्कार होय. माणसाच्या प्रकृतीवर संस्कार करण्याच्या प्रयत्नातूनच भौतिक वस्तुरूप सृष्टी आणि मानसिक सृष्टी निर्माण होते. अशी ही द्विविध निर्मिती म्हणजेच संस्कृती होय'

या अनुषंगाने संस्कृतीची व्याख्या करताना इरावती कर्वे म्हणतात,'मनुष्य समाजाची डोळयांना दिसणारी भौतिक वस्तूरूप निर्मिती व डोळयांना न दिसणारी पण विचारांना आकलन होणारी मनोमन सृष्टी म्हणजे संस्कृती होय'[२]

वरील विवेचनाचा सार हाच की समाजाची जीवन जगण्याची भौतिक व आंतरिक पद्धती म्हणजेच त्या समाजाची संस्कृती होय. समाजातील लोकांचे वागणे-बोलणे, त्यांची भाषा, त्यांच्या घरातील वस्तू, प्रतिमा, आहार, त्यांची विचार करण्याची पद्धती व दिशा, त्यांचे आदर्श आणि त्यांच्या नैतिक मुल्यांवरून त्या लोकसमुदायाची संस्कृती निश्चित होत असते.

### आंबेडकरी संस्कृती म्हणजे काय?

१४ ऑक्टोंबर १९५६ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली लाखो पुर्वास्पृश्यांनी सनातन वैदिक-हिंदू संस्कृतीला नकार देत बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. या क्रांतिकारी बौद्ध धम्म दीक्षेनंतरच्या काळात डॉ.आंबेडकरांच्या विचार-निर्देशानुसार धम्मदीक्षितांनी एक नवी संस्कृती उभी केली. याच धम्म स्वीकारानंतरच्या नव्या संस्कृतीला डॉ.यशवंत मनोहर यांच्या सारखे विचारवंत 'आंबेडकर संस्कृती' असे म्हणतात.[३] या आंबेडकरी संस्कृतीचा वारसा हा प्राचीन भारतातील बौद्ध काळापासूनचा असून याच इहवादी आंबेडकरी संस्कृतीचे प्रतिबिंब आधुनिक भारताच्या संविधानात उमटलेले आहे.

मुक्त विचार स्वातंत्र्य,आत्मा व ईश्वरवादाला नकार,विज्ञाननिष्ठ बुद्धीप्रामाण्याचा स्वीकार, व्यक्ती विकासवाद,वर्णव्यवस्थेला नकार, धर्माला नकार, धम्माचा स्वीकार, नीतीमत्तेला सर्वोच्च प्राधान्य ही आंबेडकरी संस्कृतीची प्रमुख वैशिष्टये असून ''भौतिक आणि नैतिक ही संस्कृतीची दोन्ही अंगे आंबेडकर संस्कृतीत एकजीवच झालेली आहेत. आंबेडकर संस्कृतीच्या लेखी तरी त्या गोष्टी दोन नाहितच''[४]

### आंबेडकरी सांस्कृतीची सांस्कृतिक प्रतीके

धम्म स्वीकारानंतर उदय पावलेली नवी आंबेडकरी संस्कृती आधुनिक मुल्य व विचार यावर आधारित आहे. असे असले तरी या संस्कृतीने स्वीकारलेली सांस्कृतिक प्रतीक चिन्हे.ही प्राचीन बौद्ध काळातील आहेत. या संदर्भात अमेरिकन अभ्यासक गॅरी मायकेल तार्ताकोव्ह लिहतात, ''बौध्दांनी त्यांच्या भविष्यातील इच्छा आकांक्षाचे प्रतीक आणि प्राचीन भारतातील गौरवशाली परंपरेशी असलेले त्यांचे नाते दर्शविण्यासाठी पूर्वीची मान्यताप्राप्त सांकेतिक चिन्हयोजना स्वीकारली. त्यामुळे प्राचीन भारताच्या ऐतिहासिक अवशेषांच्या फार मोठया साठयाचा त्यांना प्रत्यक्ष वारसा प्राप्त झाला''[५]

### अशोक चक्र (धम्मचक्र)

प्राचीन भारतातील सर्वश्रेष्ठ सम्राट, सम्राट अशोकाच्या सारनाथ येथील प्रसिद्ध चार सिंहाच्या स्तंभावर अंकित असलेले चक्र हे 'अशोक चक्र' म्हणून सर्वपरिचित आहे. तेच 'धम्मचक्र' म्हणून ओळखले जाते. डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धम्म स्वीकारापूर्वीच स्वतंत्र भारताच्या

*प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय,वर्धा

राष्ट्रध्वजामध्ये सत्य व न्यायाचे प्रतीक म्हणून अशोकचक्र प्रतिष्ठीत केले होते. पुढे त्यांच्या धम्म स्वीकारानंतर तेच अशोक चक्र, 'धम्मचक्र' म्हणून धम्मदीक्षित बौद्ध बांधवांनी स्वीकारले. आज आंबेडकरी समाजातील लग्नपत्रिका असोत की पत्रके, घर असो की दुचाकी वा चारचाकी, प्रत्येक ठिकाणी धम्मचक्र हे हमखास आढळतेच.पुर्वीच्या ओम व स्वस्तिक या चिन्हांची जागा धम्म दीक्षीतांच्या जीवनात आता अशोक चक्राने घेतली आहे.

**बोधिवृक्ष व पिंपळपान**

सिद्धार्थ गोतम बुद्धाला ज्ञानप्राप्ती ही बोधिवृक्षाखाली (पिंपळ वृक्ष) झाली. त्यामुळे धम्मदीक्षित बौद्धांच्या जीवनात 'बोधिवृक्ष' हा महत्वाचा सांस्कृतिक प्रतीक बनला आहे. आज नवबौद्ध आपल्या नगर वस्तीतील मोकळया जागेमध्ये बोधिवृक्ष लावतात. काही बौद्धांच्या घरातील कुंडीमध्ये बोन्साय केलेला बोधिवृक्षही पाहायला मिळतो.

या बोधिवृक्षाचे पान हे धम्मदीक्षितांसाठी महत्वाचे सांस्कृतिक प्रतिक असुन काही धार्मिक कार्यक्रमप्रसंगी बोधिवृक्षाची पाने वापरली जातात.

**स्तूपांचे आकार व सांचीचे तोरण**

बौद्ध धम्म स्वीकारामुळे धम्मदीक्षित पुर्वास्पृश्यांना फार मोठा प्राचीन बौद्ध स्थापत्य व कलेचा वारसा मिळाल्याचा उल्लेख यापुर्वी केला आहे. या वारश्यामध्ये सम्राट अशोक व इतर राज्यकर्त्यांच्या काळात मोठया प्रमाणात उभारण्यात आलेल्या स्तूपांचाही समावेश होतो. बुद्धाशी संबंधित वस्तु या स्तूपांमधून जतन करून ठेवलेल्या असत. त्यामुळे बौद्धानुयायांसाठी स्तूप हे पुज्यनीय स्थळ राहात असे. विशाल गोलघूमटामुळे स्तूप आकर्षक व भव्य वाटत असत. डॉ.आंबेडकरांनी मिलिंद महाविद्यालयाच्या स्थापत्यामधे स्तूपाकारांचा वापर केलेला होता.पुढे या स्तूपाकारांचा वापर धम्मदीक्षेनंतर मोठया प्रमाणात केला जाऊ लागला.. विशेषतः प्राचीन काळातील आंध्र प्रदेशातील अमरावती येथील स्तूपाच्या बांधणीप्रमाणे नागपूरच्या दीक्षाभूमीचा स्तूप उभा राहील्यानंतर बौद्धांमध्ये स्तूपाकार लोकप्रिय झालेला दिसतो.विशेष म्हणजे, हाच स्तूपाकार (गोल घुमट) ब्रिटिश काळात बांधलेल्या सध्याचे राष्ट्रपती भवन, सर्वोच्च न्यायालय यासारख्या महत्वाच्या राष्ट्रीय इमारतींच्या स्थापत्यामध्ये वापरण्यात आलेला आहे. सांचीच्या स्तूपाचे प्रवेशद्वार ज्यास 'तोरण' म्हटले जाते, ते सुध्दा विद्यमान आंबेडकरी संस्कृतीतील महत्वाचे प्रतीक बनले आहे. त्या तोरण आकारांचा वापर मोठया प्रमाणात विविध कला प्रकारांमध्ये केला जात असल्याचे दिसते.

**पंचशील ध्वज (धम्मध्वज)**

आंबेडकरी संस्कृतीमधील एक महत्वाचे प्रतीक म्हणजे पंचशील ध्वज होय. बौद्ध धम्म अनुयायी आपल्या सर्व धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमप्रसंगी पंचशील ध्वज फडकवित असतात. अमेरिकन कर्नल ऑलकॉट व श्रीलंकेतील जे.आर.डिसिल्वा या उभयतांनी डिझाईन केलेला हा पंचशील ध्वज जागतिक बौद्ध भ्रातृत्व संघानेच १९५० साली प्रचारात आणलेला असल्यामुळे या प्रतीकाच्या वापरातून जागतिक बौद्ध समुदायाशी आंबेडकरी बौद्ध समुदायाचा आपोआपच ऋणानुबंध जोडला गेला आहे.[६] या पंचशील झेंडयात निळा, पिवळा, लाल, पांढरा आणि नारंगी असे पाच रंग असुन पंचशीलात प्रतिपादित आहिंसा, अचौर्य, सदाचार, सत्य आणि अप्रमाद या तत्वांचे ते निदर्शक होत.

आज प्रत्येक बौद्ध वस्ती मधुन हा पंचशील ध्वज फडकताना आपणास सहज दिसू शकतो. बुद्ध जयंती, भीमजयंती, धम्मचक्रप्रवर्तन दिन इत्यादी प्रसंगी बौद्ध लोक आपल्या घरांवर, नगरातील पटांगणात, वाहनांवर पंचशील ध्वज लावतात. पंचशील ध्वजात असलेल्या रंगाचा वापर करून केलेल्या विविध आर्कषक डिझाईन्स आंबेडकरी समाजाच्या कार्यक्रमपत्रिका व शुभेच्छा पत्रांमधून वापरल्या जातात.

**निळा झेंडा**

अशोक चक्र अंकित असलेला निळा झेंडा हा पंचशील ध्वजाप्रमाणेच आंबेडकरी समाजाच्या सांस्कृतिक स्वाभिमानाचे प्रतिक बनला आहे. १९४२ साली शेडयूल कास्ट फेडरेशनच्या अधिवेशनात सर्वप्रथम निळया रंगाचा हा झेंडा फडकविण्यात आला होता. नागपूरच्या वामनराव गोडबोलेंनी निळया रंगाच्या रेशमी झेंडयावर पांढऱ्या रंगात सुर्य व त्याभोवती अकरा चांदण्या असे चिन्ह असलेला हा झेंडा

सर्वप्रथम तयार केला होता. यातील सुर्य हा डॉ.आंबेडकरांचे प्रतीक म्हणुन तर अकरा चांदण्या हया तत्कालीन अकरा प्रांतांच्या प्रतीक म्हणून दर्शविलेल्या होत्या.[८] 'पुढे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीयाची स्थापना झाल्या नंतर आजच्या स्वरूपातील अशोक चक्र अंकित असलेला झेंडा कुणा कांबळे नावाच्या रिपब्लिकन कार्यकर्त्याने डिझाईन केला.[९] मुळात हा झेंडा आर.पी. आयचा झेंडा म्हणून तयार झाला असला तरी आज आंबेडकरी समाज हा निळा झेंडा निदर्शने असोत की सण उत्सव, अशा सर्व वेळी वापरतात. झेंडयाच्याच डिझाईनमधील पताक्यांनी बौद्ध वस्त्या कार्यक्रम-उत्सव प्रसंगी सजविल्या जातात.

**स्थापत्यात आंबेडकरी प्रतीक चिन्हांचा वापर**

धम्मदीक्षेनंतरच्या गेल्या पन्नास वर्षातील बौद्धांची घरे व सार्वजानिक इमारतींचा विचार केला तर त्यांची रचना व स्थापत्य निर्मितीत नव्या आंबेडकरी प्रतीक चिन्हांचा मोठया प्रमाणात वापर केलेला दिसुन येतो. स्तुप, सांचीच्या प्रवेशद्वाराचे तोरण, अजिंठयाच्या लेण्यात आढळून येणाऱ्या बोधिवृक्षाच्या पानांच्या आकारांच्या आकृत्या, हरिण, हत्ती, धम्मचक्र, अशोक चक्र, या बौद्ध धम्माशी संबधित असलेल्या प्रतीक चिन्हांचा वापर घर बांधताना बौद्ध व्यक्ती मोठया प्रमाणात करताना दिसतात. संपुर्ण घरावर जर प्रतीक चिन्हे खर्चामुळे करता आली नसतील तर निदान मुख्य दरवाजा, कंपाऊंड वॉलचे गेट यावर तरी एखादे पिंपळपान, स्तूपाकार किंवा धम्मचक्र हमखासच काढलेले आढळते.

**निष्कर्ष**

सारांश रूपाने असे म्हणता येते की, १९५६ च्या ऐतिहासिक धम्म दीक्षेनंतरच्या काळात स्वातंत्र्य, समता, बंधूता, न्याय, विज्ञान अशा आधूनिक मुल्यांवर आधारित नवी आंबेडकरी संस्कृती उभी राहीली.

या संस्कृतीने धम्मदीक्षितांना जुन्या पारंपारिक हिंदू धर्माच्या सांस्कृतिक तुरूंगातून मुक्त केले.[१०] या संस्कृतीने प्राचीन बौद्ध संस्कृतीतील प्रतीकांना आपला वारसा माणुन त्याचा स्वीकार केलाच शिवाय जागतिक बौद्ध बांधवाशी एकरूपता साधीत पंचशील ध्वजालाही आपलेसे केले. आंबेडकरी संस्कृतीच्या लोकशाहीवादी संघर्षाचे निशाण म्हणून धम्मचक्र अंकीत निळया झेंडयाचे नवे प्रतीक या संस्कृतीने निर्माण केले. आधूनिक भारताच्या संविधानाचेच अप्रत्यक्ष प्रकटन आंबेडकरी संस्कृती असल्यामुळे तिच्या सांस्कृतिक प्रतीकांना आपोआपच राष्ट्रीयत्व प्राप्त झाले आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१ डॉ.मनोहर यशवंत , *आंबेडकर संस्कृती*, युगसाक्षी प्रकाशन नागपूर, २००६ पृ.८

२. तत्रैव.पृ. ८

३. तत्रैव.पृ. २५

४. तत्रैव.पृ. ३६

५. डॉ. आगलावे प्रदीप, *धम्मचक्र प्रवर्तनानंतरचे परिवर्तन*, प्रकाशकः आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद, २००९, पृ. ७७

६ जोहान्स बेल्टज, *महार दलित बुद्धीस्ट*, मनोहर पब्लिकेशन नवी दिल्ली, २००६ पृ.१६४

७ दीक्षा विशेषांक, दै.सकाळ, ऑक्टोंबर २००६, नागपूर पृ. १२२

८ जोहान्स बेल्टज, उनि, पृ. १६४.

९ जोहान्स बेल्टज, उनि, पृ. १६४.

१० प्रा.कांबळे गौतमीपुत्र, *'धम्मक्रांतीचे सांस्कृतिक अवकाश'*, संपा जगन्नाथ कराडे, धम्मक्रांतीची फलश्रुती, तक्षिला प्रकाशन, पुणे, २००६, पृ.१४२